Aarhat Publication & Aarhat Journal's

**E**LECTRONIC **I**NTERNATIONAL **I**NTERDISCIPLINARY **R**ESEARCH **J**OURNAL

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (EIIRJ)

Peer Reviewed Interdisciplinary Refereed Research Journal

Impact Factor: 6.21 (SJIF)

March – April. 2020

Volume–IX, Issues– II

# Reconstruction of Indian Education System: Lead in Global Market

Chief Editor

Dr.Amol Ubale

Aarhat Publication & Aarhat Journal's

E LECTRONIC I NTERNATIONAL I NTERDISCIPLINARY R ESEARCH J OURNAL

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (EIIRJ)

Peer Reviewed Interdisciplinary Refereed Research Journal

Impact Factor: 6.21 (SJIF) March – April. 2020

Volume–IX, Issues– II

# Reconstruction of Indian Education System: Lead in Global Market

Chief Editor

Dr.Amol Ubale

# INDEX


| Sr. No. | Title of the Research Paper | Author Name | Page No |
|---|---|---|---|
| 1 | A Study Of Role Of Educational Institution In Social Responsibility | Dr. Diwakar Dhondu Kadam | 1 |
| 2 | वित्तीय बाजार (प्रणालीचा )विकास | डॉ.अविनाश निकम | 6 |
| 3 | संशोधन व्यवस्थापन कार्यनिती आणि शैक्षणिक संपादन यातील सहसंबंधाचा अभ्यास | डॉ.सीमा परटोले | 17 |
| 4 | Higher Education In India: An Exercise To Catch Up With Liberalisation, Privatisation And Globalisation. | Prof. Grace Verghese | 25 |
| 5 | New Era Towards Cashless Transaction | Mr. Amol Bhausaheb Sonawane | 32 |
| 6 | इंग्रजांचे भारतातील शैक्षणिक धोरण आणि आधुनिक शिक्षणाची सुरुवात | प्रा.अनंत घरत | 35 |
| 7 | Western Education & Indian Education Comparative study | Mr. Anil K. Telinge | 40 |
| 8 | व्यवसायाभिमुख अध्ययनाच्या बदलाचा संक्षिप्त आढावा | प्रा.अरविंद रा. जाधव | 44 |
| 9 | जागतिकीकरण आणि भारतीय शेती | सौ.अश्विनी पाटील | 48 |
| 10 | Budget Allocation for Education Sector in India: An Analysis | Prof. Nitin R. Wadhvinde | 53 |
| 11 | भाषांतरातील व्यावसायिक संधी | प्रा -राजश्री प्रदीप कदम | 58 |
| 12 | Inclusive Education Through Assistive Technology For Visually Impaired Students | Prof (Mrs) Safina Shahid Rakhangi<br>Prof (Mrs) Rita George Chettiar | 63 |
| 13 | Communication Skills - Key To Aquire Desire Outcomes And Reconstruct Education System | Prof. Sagar Shashikant Mohite | 69 |
| 14 | मराठीच्या विद्यापीठीय अभ्यासक्रमात व्यावसायाभिमुखतेसाठी अपेक्षित बदल | प्रा. संजय तुकाराम निचिते | 74 |
| 15 | Role Of ICT In The Curriculum Educational System | Prof .Shirish Chandrakant Samel | 78 |
| 16 | कादंबरी ते चित्रपट व्हाया दुप्पट मनोरंजन | डॉ.म्हस्के सीताराम | 83 |

| | | | |
|---|---|---|---|
| 17 | Desired Reforms in Indian Education System | Miss. Sonam Pyarelal Gupta | 91 |
| 18 | जाहिरात लेखन आणि व्यवसायाच्या संधी | डॉ.सुजाता कुलकर्णी | 95 |
| 19 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०१९ : एक मागोवा | श्री.अनिल महादेव बोराडे | 105 |
| 20 | वंचित (सबाल्टर्न) विचारप्रणाली | सौ.सुजाता म्हात्रे | 111 |
| 21 | २१ व्या शतकात मराठीच्या विद्यापीठीय अभ्यासक्रमात व्यवसायभिमुकतेसाठी अपेक्षित बदल | डॉ.चिंतामण भोईर | 116 |
| 22 | महाराष्ट्रामधील आणि जपानमधील भाषा विषयक शिक्षण पद्धतीच्या तुलनात्मक विचार | अनुजा कानडे मोरे | 122 |
| 23 | जाहिरात लेखन व व्यावसायिक संधी | रजनी कुचे | 126 |
| 24 | पाश्यात्य शिक्षण पद्धतीचा भारतात झालेला प्रसार | डॉ.श्वेता मुजुमदार | 132 |
| 25 | प्रसार माध्यमे आणि लेखन कौशल्ये | प्रा.यादव धोंडू मोरे | 135 |
| 26 | शिक्षण पद्धतीतील नवे बदल : एक विचार मंथन | सनिलदत्त गोडसे | 141 |
| 27 | जाहिरात लेखन व व्यावसायातील संधी | प्रा.रोहिणी मदने | 144 |
| 28 | Water Resources In Thane District And Its Historical Impact And Importance 1880 To 2018 | Dr. Adhikari Sunil D. | 148 |

# प्रसार माध्यमे आणि लेखन कौशल्ये

प्रा. यादव धोंडु मोरे

सोनोपंत दांडेकर कला, वा. श्री. आपटे
वाणिज्य व एम.एच.मेहता विज्ञान
महाविद्यालय, पालघर

**प्रस्तावना :**

आपल्या दैनंदिन जीवनात प्रसार माध्यमांचे महत्व वरचेवर वाढत आहे. आजच्या युगाला माहिती युग असे म्हटले जाते. रेडिओ आणि दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम तर आपल्या रोजच्या जीवनाचा अविभाज्य भागच बनलेला आहे. इतक्या महत्वाच्या माध्यमाविषयी आपण उदासीन राहून चालणार नाही तर या माध्यमाचा अभ्यास केला पाहिजे. म्हणून प्रसार माध्यमांसाठी लेखन कौशल्य या अभ्यासाची मी निवड केलेली आहे.

प्रसार माध्यमांच्या स्वरूपाची आणि परिणामाकारकतेची माहिती दिलेली आहे. प्रसार माध्यमासाठी लेखन करतांना कोणती काळजी घ्यावी याचा तपशील दिलेला आहे.

प्रसार माध्यमे महत्त्वाची असतात. ह्या माध्यमांमुळे लेखकाला भरपूर संधी मिळत असते. कारण ही चंदेरी दुनिया आहे. या चंदेरी दुनियेत प्रसिध्दी असल्यामुळे कोणत्याच वस्तुंना प्रसिध्दी मिळणार नाही. या माध्यमांचा अधिकाधिक वापर होत असल्यामुळे क्षणात एखादी घटना दुरवर पोहोचते. ही माध्यमे संवेदनशील आणि शक्तिशाली आहेत. अशा मोहापायी माध्यमांसाठी लेखन करण्याची स्पर्धाच चाललेली असते. प्रत्येकाला आपले लेखन, भाषण, मुलाखत, रूपक, नाटक प्रसार माध्यमाद्वारे प्रकाशित व्हावे, प्रसारीत माध्यमांसाठी लेखन करायचे असते. तर या माध्यमांचे जाळे सर्वदूर पसरलेले आहे. अशा प्रभावी माध्यमांसाठी लेखन करायचे असते. तर या माध्यमांच्या स्वरूपाचा आणि वैशिष्टयाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**वृत्तपत्राचा चेहरा:**

आपले गाऱ्हाणे मांडण्याचे लोकशाही मताविरूध्द हक्काचे साधन म्हणून सर्वसामान्य नागरिक वृत्तपत्राकडे पाहतात. याच्या व्यतिरिक्त शिक्षण देणे, माहिती पुरविणे, मनोरंजन करणे, प्रबोधनासाठी पुर्ततयारी यादृष्टीने पूर्ततयारी स्थान मोठे आहे. याच्या व्यतिरिक्त शिक्षण देणे, माहिती पुरविणे, मनोरंजन करणे, प्रबोधनासाठी पुर्ततयारी यादृष्टीने पूर्ततयारी स्थान मोठे आहे. स्पर्धेच्या युगात वृत्तपत्राचे ताज्या बातम्या सलगपणे देणाऱ्या अनेक दूरचित्रवाणी इलेक्ट्रानिक माध्यमातून सुरू झाल्या आहेत. स्पर्धेच्या युगात वृत्तपत्राचे महत्व थोडेही कमी झालेले नाही.

वृत्तत्रांचे जग सुरू होण्यापूर्वी छापखान्यांचे युग सुरू झाले. मुद्रणक्रांती झाल्यामुळेच वृत्तपत्रांचा जन्म झाला. त्यामुळे जगातील प्रबोधनाला वेगळी गती आणि दिशा मिळाली. जर्मनीच्या गटेनबर्ग येथे छापखाना सुरू झाला.१६ व्या शतकात माहिती क्रांतीचा पाया रचला गेला. ही सार क्रांती लक्षात घेऊनच वृत्तपत्रांच्या इतिहासातील पाने पहाती लागेल.

मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासात डोकावल्याशिवाय भारतातील वृत्तपत्रांचा आरंभ या वृत्तसृष्टीला सामाजिक जागरणाचा आधार देणारे भारतीय समाज प्रबोधनाचे उद्गाते. राजा राममोहन रॉय हे आहेत. 'दर्पण' या मराठीतील पहिल्या

वृत्तपत्राची सुरूवात लोकहितवादी शतपत्रे, केसरी, आणि सुधारक,दिनबंधू ही नव्या जाणिवेची वृत्तपत्रे असा १९ व्या शतकातील कालखंड दिसून येतो.

**वृत्तपत्रांचा इतिहास :**

जागतिक आणि भारतीय स्तरावरील वृत्तपत्राचा इतिहास कालखंड भाषेत नमूद करावयाचा म्हटल्यास २०० वर्षांच्या आसपासचा आहे. मुद्रण कलेचा आरंभ युरोपात झाल्यामुळे वृत्तपत्रांचा उगमही पहिल्यांदा तिथेच झाला.

इंग्लंड आणि हॉलंड मध्ये हॅकविलाच्या स्वरुपात लढाया, राजे महाराजांच्या हालचाली या बातम्या छापून ती विकली जात. ती विकणारी विक्रेते जोरजोरात ओरडून लोकांचे लक्ष वेधून घेत असत. या पत्रांना त्यावेळी ‘गॅझेट’ म्हटले जात असे.

मुद्रणाच्या बाबत भारतात आरंभ झाला तो धार्मिक वाङ्‌मय छापण्यास भारतातील पहिला छापखाना सुरू झाला तो गोव्यात. १५६१ साली या छापखान्यात पहिले भारतीय पुस्तक छापले गेले. त्याची प्रत आज न्युयॉर्क येथील सार्वत वाचनालयात उपलब्ध आहे.

**१)बंगालमधील सुरूवात :**

वृत्तपत्राचा इतिहासात बंगालमधील घडामोडींना महत्त्वाचे स्थान आहे. एक तर ब्रिटीश आमदानीच्या काळात सर्वात महत्त्वाचा टापू त्यावेळी कलकत्ता येथे होता. वृत्तपत्रांच्या भारतीय भूमीतील इतिहासात ‘ हिकीज गॅझेट’ या वृत्तपत्राचा उल्लेख सर्वात आरंभी केला जातो.जेम्स ऑगिस्टीन हिकी यांच्या बंगाल गॅझेट या इंग्रजी साप्ताहिकाचा पहिला अंक २९ जाने. १७८० साली प्रसिध्द झाला.

**२) भारतीय वृत्तपत्रांचे जनक :**

भारतीय प्रबोधन उद्‌गाते राजा राममोहन रॉय यांच्याकडे पहिले खरेखुरे भारतीय जाणिवेचे वृत्तपत्र सुरू करण्याचा मान जातो. १८२२ साली ‘मुंबई समाचार’ हे गुजराती भाषेतील साप्तहिक मुंबईत सुरू झाले. देवनागरी लिपितले पहिले हिंदी वृत्तपत्र कदत्न मार्तंड यांनी कलकत्यामधून ३० मे १८२६ रोजी सुरू झाले.

इ.स. १८३२ साली बाळशास्त्री जांभेकर यांचे ‘दर्पण’ हे वृत्तपत्र निघाले. मराठीखेरील बंगाली आणि इंग्रजी भाषा अवगत असणारे जांभेकर कोकणातून मुंबईत आले. ६ जाने १८३२ रोजी मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेतून चालणारे वृत्तपत्राचा पहिला अंक प्रसिध्द झाला. जांभेकरानी मराठी वृत्तपत्रांची उज्जवल कारकीर्द सुरू झाली. १८३२ साली सुरू झालेले दर्पनपत्र २६ जून १८४० रोजी बंद पडले.

जांभेकराचे बंद पडलेले साप्ताहिक ‘प्रभाकर’ हे वृत्तपत्र १८४१ ते १८६२ पर्यंत सुरू केले. तसेच त्यांनी ‘धुमकेतू’ नावाचे साप्ताहिक आणि ‘ज्ञानदर्शन’ नावाचे त्रैमासिक सुरु केले. लोकहितवादीची ‘शतपत्रे’ याच पत्रातून महाजनांनी प्रसिध्द केली होती. १२ फेब्रु, १८४९ रोजी ‘ज्ञानप्रकाश’चे संपादक काकासाहेब लिमये यांनी दूरदृष्टीने मुंबई आवृत्ती सुरू केली. त्यांच्या विवध स्वरूपाच्या मजुकरामुळे ‘ज्ञानप्रकाश’ विलक्षण लोकप्रिय झाले. मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासातील १८५७ च्या उठावाचा कालखंड अधिक बारकाईने अभ्यासण्याची गरज आहे. स्वातंत्र्यासाठी झालेला १८५७ उठावाच्या दरम्यान भारतातील जातीव्यवथा विरूध्दचा म. फुले यांनी सामाजिक उठाव यांचा विचार करताना वृत्तपत्रांचे महत्त्व सर्वांच्या लक्षात येऊ लागले.

**३)सुधारकचा आरंभ :**

लो. टिळकांनी केसरी तून सर्वसामान्याशी संवाद साधला परंतू पुढे केसरीतून बाहेर पडल्यानंतर वर्षभराने गोपाळ गणेश आगरकरांनी 'सुधारक' नावाचे पत्र सुरू केले. समाजसुधारणा हा त्याचा अग्रक्रम होता. आगरकरांना सर्वांगीण समाजसुधारणा विशेष करून स्त्रियांचे विशेष स्थान या विषयाकडे लक्ष वेधायचे होते त्यानुसार त्यांनी लेखन केले.

**४)'मुकनायक' आणि 'बहिष्कृत' भारत :**

म. फुले आणि सत्यशोधक विचारांना समोर ठेवून आणि पुण्यातील सनातनी पत्रांना वैचारिक शह देण्यासाठी बहुजन समाजातील जाणकरांनी आपली पत्रे सुरू केली. भारतीय समाज व्यवस्था जणू बदलण्याचा निर्धार व्यक्त केला. मराठी वृत्तपत्रांच्या नव्हे तर भारतीय वृत्तसृष्टीच्या इतिहासत या पत्रांचे स्थान अनन्यसाधारण आहे.

ज्या काळात दलित समाजाचे साक्षरतेचे प्रमाण हजारी ९ देखील नव्हते त्या काळात असे वृत्तपत्र सुरु करणे धाडसाचे होते. दलित आणि शुद्र समजाला विषमाताधिष्ठित समाजव्यवस्थेतून मुक्त करण्यांची आकांक्षा डॉ. आंबेडकरांनी बाळगली होती. त्यासाठी आपले विचार मांडणारे पत्र असावे या भूमिकेतून त्यांनी वृत्तपत्रांची निर्मितीत रस घेतला. 'मुकनायक' हे पाक्षिक ३१ जाने. १९२० रोजी सुरु केले. सत्याग्रहासाठी वातावरण निर्मिती आणि प्रबोधनांच्या हेतुने 'बहिष्कृत भारत' चे प्रकाशन सुरू केले. एप्रिल १९२७ बहिष्कृत भारत चे प्रकाशन सुरू केले. यानंतर बाबासाहेबांनी 'जनता' १९३०, आणि पुढे धर्मांतरांच्या काळात 'प्रबुध्द भारत' १९५६, चे अंक संपादित ग्रंथात आज वाचायला मिळतात.

**घटक - २**

**बातमी लेखन :**

एखादया घरात घडलेल्या घटनेबाबत जशी उत्सुकता घरातल्या लोकांना असते तशीच उत्सुकता वृत्तपत्रांच्या कवेरीत असते. वृत्तपत्र म्हणजे बातमी अथवा वृत्त देणारे पत्र म्हणजेच बातम्या देणारे, माहिती देणारे साधन वर्तमानपत्र होय. कोणत्याही वर्तमानपत्राचे मूख्य भांडवल असते ती बातमी.

**बातमी म्हणने काय?**

बातमीची सर्वसमावेशक व्याख्या करत असतांना त्यांचे आधारभूत घटक असलेल्या गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे. बातमी ज्यातून तयार होते असे पाच 'क' आहेत ते पुढील प्रमाणे कोण, काय, कोठे, केव्हा आणि का? हे ते प्रसिध्द 'क' कार आहेत. सगळीकडच्या बातम्या देणारे पत्र म्हणजेच वृत्तपत्र एका ताह्निीतर मध्यंतरी NEWS या शब्दाची फोड करतांना North] East, West and South या दिशांचा उल्लेख करुन सर्व दिशांचे कव्हरेज आम्ही करतो असे सांगितले.

जॉन क्लिरॉन यांच्या दृष्टीने बातमी म्हणजे जुनी गोष्ट होय. बातमीचा विषय आज उद्याशी संबंधीत असतो. 'काल' हा बातमीचा विषय असत नाही. ज्येष्ठ पत्रकार चंचल सरकार यांनी बातमीच्या समीपतेबाबत एक मांडणी केली होती. ती लक्षात घेतली तर बातम्याचा समावेश कशा तऱ्हेने होऊ शकतो हे लक्षात येते. स्थानिक बातम्या, प्रादेशिक बातम्या, यांच्या पाठोपाठ महत्वाच्या ठरतात. शेजारच्या राज्यातील बातम्या म्हणजे महाराष्ट्राच्या तुलनेने कर्नाटक, गुजरात इ. या शेजारील राज्यातील बातम्या महत्वाच्या ठरतात.

बातमी लिहिताना त्या घटनेतील सर्वात महत्त्वाची गोष्ट अग्रभागी यायला हवी म्हणजे बामीचा जो इंट्रो लिड आहे त्यातच ह्या गोष्ट स्पष्ट झाल्या पाहिजे.

**१) वृत्तलेखन, स्तंभलेख, मुलाखत व समीक्षात्मक लेखन :**

वृत्तपत्रीय जगात NEWS शब्दा पाठोपाठ feature शब्दांचे महत्त्व वाढले आहे. कारण बातमी पाठोपाठ या वृत्तलेखांना महत्त्व आले आहे. केवळ बातमीने वाचक समाधाली होणार नाहीत तर त्याला अधिक माहिती देण्याची गरज जेव्हा वृत्तपत्रांना वाटते. त्यावेळेस वृत्तलेख लिहिले जातात. बातमीजा जसा कोणताही विषय वर्ज्य नाही त्याप्रमाणेच सर्व विषयांचे आकर्षण वृत्तलेखांच्या बाबतीत असते. यात बातमी तर असतेच पण त्यापेक्षाही अधिक असते त्यामागची पार्श्वभूमी, माहिती तिचा उपयोग करुन माहिती तपासून पक्के करुन त्यावर भाष्य करीत वृत्तलेखन केलेले असते.

**१. विविध विषयावरील वृत्तलेख** -प्रत्येक माणसाला रुची असणाऱ्या विषायांचा समावेश असणारे लेखन Human Interest Feature म्हणून ओळखले जाते. प्रसार माध्यमांच्या सर्व स्तरात हे लेखन आज सर्वाधिक महत्तवाचे मानले जाते. एखाद्या माणसाचा चांगुलपणा, प्रामाणिकपणा, मदत करण्याची वृत्ती, प्राण्यावरचे प्रेम, समाजातील वेगळे काम करण्यांचे प्रयत्न इत्यादी.

**२.स्तंभलेखन आणि सदरे** - यांचा विचार करतांना माणूस दिनांक, मार्मिक, अतंर्नाद, अस्मिता दर्शन, रुची या नियतकालिकाचांही विचार एक अभ्यास म्हणून करावा लागेल. या नियतकालिकांनाही स्वतःचे वेगळे व्यक्तिमत्व जपले. कोवळी उन्हे, आणि रामप्रहर हे स्तंभ विलक्षण लोकप्रिय ठरले. 'चौफेर' स्तंभातून गडकरींनी समाजाशी आपले नाते दृढ केले. यांनी आपल्या वृत्तपत्राची वेगळी ओळखही वाचकांना करुन दिली.

**३. मुलाखत** -मुलाखत हा वृत्तपत्रीय माध्यमातीलच नव्हे तर इलेक्ट्रॉनिक माध्यमातील ही सर्वाधिक लोकप्रिय प्रकार आहे. मुलाखतीनी वृत्तपत्रे रोचक बनतात आणि दूरचित्रवाहिण्यावरील कार्यक्रम Live होतात हे आता नव्याने सांगण्याची आवश्यकता वाटत नाही.

पत्रकारितेतील सर्वात विश्वासार्ह घटक म्हणून 'मुलाखत' या लेखनप्रकारकडे पाहिले जाते. सत्य काय आहे हे समजून घेण्यासाठी संबंधित व्यक्तीची मुलाखत फार महत्त्वाची ठरते.

**४. वृत्तपत्रीय समिक्षणात्मक लेखन** -वृत्तपत्रांच्या दृष्टीने नवनवे विषय वाचकांना समजून देणे हा त्यांच्या प्रसाराचा महत्त्वाचा घटक असतो. म्हणूनच पुस्तके, खेळ, कला यांच्या वेगळेपणाची ओळख करुन देण्याला विशेष स्थान आणि ठळक जागा वृत्तपत्रे उपलब्ध करुन देतात. वृत्तपत्राच्या सर्वसाधारण वाचकांना किमान माहिती ओळख आणि रसग्रहणच्या वाचता यावे यादृष्टीने अशा विषय निहाय समीक्षकांना महत्त्व असते.

आता वृत्तपत्रात या विविध क्षेत्रातील कलाकृतीच्या समीक्षणांना महत्तव आले आहे. उदा- आचार्य अत्रे, गोविंद तळवलकर, कुमार केतकर, डॉ. अरुणा ढेरे इ.

**५. पत्रलेखन** - ज्याप्रमाणे वृत्तपत्रे हे समाजा आरसा मानला जातो त्याप्रमाणे वृत्तपत्राचा चेहरा वाचकांच्या पत्रव्यवहारातून दिसत असते. सर्व वर्तमानपत्राचा खरा आधार वाचकच असतात. त्यामुळे वाचकांची मते त्यांचे दृष्टीकोन यांना पुरेसे आणि वाजवी स्वतंत्र दिलेले असते. एका परिने वृत्तपत्राच्या जणघडणीत त्यांचा चेहरा मोहरा बदलण्याची सुचक शक्ती वाचक नाताच्या घटकात असते.

**२) जाहिरात** :

आजचे युग जाहिरातीचे युग आहे ही भाषा आपण सर्वत्र ऐकतो. मुद्रित माध्यमांना जाहिरातीमुळे आर्थिक बळ मिळते. त्यामुळे जाहिरात ही मुद्रित माध्यमांना व्यापणारा घटक आहे. मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये आत्मसात करण्याच्या अभ्यासात भाषेचा वापर करण्याच्या दृष्टीने जाहिरातीचा विशेष विचार करावा लागतो.

जाहिरात म्हणजे लोकांना प्रभावीपणे माहिती देऊन आपली वस्तू विकण्याचे अथवा घेण्यांचे कौशल्य होय. याचा अर्थ वर्तमानपत्रातील जाहिरातीला त्यामुळे विशेष महत्त्व येते. जाहिरातीचे विविध प्रकार पडतात.

१) छोट्या किंवा क्लासिफाईड जाहिराती.

२) सरकारी जाहिराती.

३) ग्राहकप्रधान उत्पादनांच्या जाहिराती.

**जाहिरातीचे लेखन -**

जाहिरातीचा मसुदा लिहिणे अतिशय कौशल्याचे काम असते. थोडक्यात आशयव्यक्त करणारी जाहिरात नेहमीच गाजते, लोकप्रिय होते. उदा - पिकोलेक्सने आणलं पाणी, शेत पिकली सोन्यावाणी.

**३) निबंध प्रकार :**

इ.स. १८१८ साली पेशवाईचा अस्त झाला व ब्रिटिशांच्या प्रभावाने भारतीयांना आपल्यातील दोष दुर्गणाची चिकित्सा करण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. वृत्तपत्राद्वारे समाजापुढे विविध विषयासंबंधीचे ज्ञान देणे आणि त्याला विचारप्रवृत्त करण्याचे कार्य सुरु झाले.

गोपाळ हरी देशमुख 'लोकहितवादी' यांनी १८४८ ते १८५० या काळात 'शतपत्रे' प्रसिद्ध केली. यामध्ये सामाजिक, राजकीय अधोगतीची कारणमिमांसा करण्यात आली होती. निबंधात माहिती, विवरण, स्पष्टीकरण, विवेचन असते परंतु कथेप्रमाणे किंवा नाटकांप्रमाणे अनुभवाची निर्मिती, कथन किंवा नाटकीकरण नसते. निबंधात वैचारिकतेला महत्त्व असते. उदा- थोर नेता म.गांधी असे निबंधाचे स्वरुप असते.

**निष्कर्ष :**

प्रसार माध्यमासाठी लेखन कौशल्य यावरुन काढण्यात आले आहेत. ते

प्रसार माध्यमासाठी लेखन कौशल्य वृत्तपत्राचा प्रारंभ व झपाट्याने झालेली प्रगती याचा परिणाम असल्याचे दिसून

- प्रसार माध्यमासाठी लेखन कौशल्य वृत्तपत्राचा प्रारंभ व झपाट्याने झालेली प्रगती याचा परिणाम असल्याचे दिसून येते.
- प्रबोधानासाठी पूर्वतयारी या दृष्टीने वृत्तपत्राचे स्थान मोठे आहे.
- इ.स. १८३२ ते २००१ पर्यंतचा जवळपास १६९ वर्षांचा वृत्तपत्राच्या इतिहासाचा आढावा घेतल्यास वृत्तपत्र हे समाजाचा आरसा असून त्यातून निर्माण होणारे साहित्य सत्य व वस्तूनिष्ठ असल्याचे दिसून येते.
- वृत्तपत्र किंवा माध्यमातील लेखन कौशल्यामध्ये भाषेच्या कौशल्यास अधिक महत्त्व असते.
- राष्ट्रीय स्तरावर भारताची राजधानी दिल्ली आणि आर्थिक स्तरावर आर्थिक राजधानी असलेली मुंबई येथील बातम्या महत्त्वाच्या ठरतात.
- बातमी मध्ये 'क' कार यांना अधिक महत्त्व असते त्याशिवाय बातमी तयार होत नाही.
- वृत्तपत्रातील स्फूट लेखन, ललित, गद्य लेखन, वृत्तपत्र लेखन, पत्रलेखन, बालवाड्मय, जाहिराती लेखन, वृत्तलेखन, स्तंभलेखन, वृत्तांत लेखन या सर्वांच्या माध्यमातून मराठीत विपूल प्रमाणात साहित्य निर्मिती झाली आहे.

**उपसंहार :**

प्रसार माध्यमांसाठी लेखन करतांना स्फूट लेखन, ललित, गद्य लेखन, वृत्तपत्र लेखन, पत्रलेखन, बालवाड्मय, जाहिराती लेखन, वृत्तलेखन, स्तंभलेखन, वृत्तांत लेखन या सर्वांच्या माध्यमातून मराठीत विपूल प्रमाणात साहित्य निर्मिती व मुद्रीत लेखन झाले आहे. त्यामुळे हे सर्व लेखनामुळे आपले साहित्य दर्जेदार झाले आहे हेच यावरुन आपल्या लक्षात येते.

**संदर्भ :**


१. रा.के. लेले, मराठी वृत्तपत्राचा इतिहास, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
२. वंसत मून, (संपा) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, मुंबई, महाराष्ट्र शासन.
३. य.दी.फडके, (संपा) दिनकरराव जवळकर समग्र वाङ्मय, मु. मुले समता प्रतिष्ठान.
४. माधव गडकरी, चौफेर खंड- १ ते ५, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
५. भास्कर नंदनवार, बातचीत, भाऊसाहेब माडखोलकरांशी, नागपूर
६. पु.ग.सहस्त्रबुद्धे, लोकहितवादीची शतपत्रे, पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
७. Kevel J. Kumar, Mass Communication in India, Mumbai, Jaico Publication House.
८. अक्षर दिवाळी अंक २०००, (संपा) निखिल वागळे, संदर्भीय माहिती युगाच्या उंबरठयावर, मुंबई, अक्षर प्रकाशन.

**AARHAT PUBLICATION & AARHAT JOURNAL'S**

108, Gokuldham Park, Dr. Ambedkar Chowk, Near T.V. Tower, Badlapur (E)-421503

**Email ID:** aarhatpublication@gmail.com • **Phone:** 9822307164

**Website:** www.aarhat.com